गडचिरोली-चिमूर क्षेत्राच्या  विकासासाठी खा. नेते यांना पुन्हा निवडून द्या - सुधीर मुनगंटीवार

गडचिरोली दि.७- गडचिरोली-चिमूर क्षेत्राच्या विकासासाठी भाजपा, शिवसेना, आरपीआय(आठवले) व परिवर्तन पॅनलचे उमेदवार खासदार श्री अशोक नेते यांना प्रचंड बहुमताने निवडून देण्याचे आवाहन राज्याचे अर्थमंत्री श्री सुधिरभाऊ मुनगंटीवार यांनी केले आहे.

अशोक नेते यांच्या प्रचारासाठी भव्य प्रचार सभा आज गडचिरोलीत पार पडली. यावेळी बोलतांना मुनगंटीवार म्हणाले कि, अशोक नेते यांना निवडून आणा मी त्यांच्या निर्वाचन क्षेत्रातील विकासकामांसाठी निधींची कमतरता पडू देणार नाही. येत्या ५ वर्षात वडसा ते गडचिरोली रेल्वे सुरू होईल, गोंडवाना विद्यापीठ एक आदर्श विद्यापीठ होईल व येथिल बेरोजगारांसाठी अनेक रोजगार निर्माण केले जातील असेही आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

खासदार अशोक नेते, पालकमंत्री राजे अंबरीश आत्राम, तथा अनेक  आमदार डॉ देवरावजी होळी,आमदार कृष्णजी गजबे,आमदार रामदासजी आंबटकर,आमदार बंटीभाऊ भांगडीया, माजी आमदार अतुलजी देशकर, माजी आमदार भेरशिंगजी नागपुरे, माजी आमदार केशवराव मानकर, जेष्ठ नेते किसन नागदेवे ,जेस्ट नेते बाबूरावजी कोहळे,महामंत्री रवींद्र ओलालवार, संजयजी गजपुरे, प्रशांत वाघरे,डॉ भारत खटी, यावेळी नेत्यांची भाषणे झाली त्यावेळीं लोकसभा क्षेत्रातील 20 ते 25 हजार लोकांचा जनसागर उपस्थित होते.

यावेळी अशोक नेते यांनी भाजप सरकारने ओबीसींचे आरक्षण १९ टक्के पूर्ववत केल्याचे सांगितले. वडसा-गडचिरोली रेल्वेमार्ग आपण मंजूर केला असून, आचारसंहिता संपल्यानंतर या लोहमार्गाचे काम सुरु होणार असल्याचे सांगितले. आपल्या लोकसभा मतदारसंघात आपण प्रयत्न केल्याने १३ हजार कोटींचे राष्ट्रीय महामार्ग मंजूर झाल्याचे सांगून श्री.नेते यांनी नागभिड-नागपूर ब्रॉडगेजसाठी निधी खेचून आणल्याचे सांगितले. सिंचनासाठी ५ बंधारे आपल्याच प्रयत्नाने मंजूर झाल्याचेही श्री.नेते यांनी सांगितले.